


**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# कवी वाहरू सोनवणे यांच्या कवितेतील प्रतिमा आणि प्रतीके

**श्री. तेजस सुरेशराव डेहनकर**
संशोधक विद्यार्थी,
पदव्युत्तर मराठी विभाग व संशोधन केंद्र,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था (स्वायत्त), अमरावती

## ❖ प्रास्ताविक -

महाराष्ट्रातील कवीपरंपरा ही देवदेवतांपासून तर आपल्या आधुनिक काळापर्यंत अखंडीतपणे चालत आली आहे. ही कवीपरंपरा आपली स्थिरता टिकवून ठेवण्यासाठी अनेक प्रयत्न करत आपल्यासमोर ताठमानेने उभी आहे. ही परंपरा मराठी साहित्यात एकरूप झालेली दिसते. महाराष्ट्रातील कवी परंपरेने अनेक चढ-उतार झेलत आपली अस्मिता टिकवीली आहे. यात कधी समाजाला दिशा दाखवणारी वेद पुराणे, कधी समाजातील सुख-दुःखाचे विस्तृत वर्णन करणारी कविता कवीच्या निर्मीतीचा विषय होताना दिसते, तर कधी या समाजव्यवस्थे विरूद्ध बंड पुकारताना दिसते. जशी समाजातील व्यक्तीची स्थिती तशी कविता जन्माला येताना दिसते.

आदिवासी कवितेचा विचार करता आदिवासी काव्याचे दोन कालखंड सांगता येतील पहिला स्वातंत्र्य पूर्व कालखंड तर दूसरा स्वातंत्र्योत्तर कालखंड स्वातंत्र्यपूर्व काळातील आदिवासी साहित्य हे फार कमी व अलिखित स्वरूपात आहे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळातील आदिवासी साहित्याचे स्वरूप लिखित व विस्तृत स्वरूपात आपणास पाहावयास मिळते.

१९७५ ते २००७ हा कालखंड म्हणजे आदिवासी क्रांतीकाव्याचा कालखंड म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. आदिवासी काव्य याच काळात फुलले-बहरले आणि चांगल्या प्रकारे विकसित झाले. आदिवासी काव्याची निर्मिती ही मोठ्या संख्येने नसली तरी जे लिहिले गेले ते अतिशय कसदार आहे. या काळात आदिवासी नवशिक्षित तरूणांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. परिणामी त्यांच्या जीवन जाणिवा व विचार करण्याच्या पद्धतीत फरक पडला. विशेष म्हणजे हा तरूणवर्ग बोलू व लिहू लागला. याच काळात साहित्यात सुद्धा मोठे बदल घडत गेले. डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या मते, "आदिवासी काव्याची खरी

रूजुवात झाली ती आदिवासी साहित्याचे गाढे अभ्यासक, विचारवंत, आदिवासी मित्र डॉ. विनायक तुमराम यांनी १० ते ११ नोव्हेंबर १९७९ रोजी भद्रावती जि. चंद्रपुर येथे पहिले आदिवासी साहित्य संमेलन आयोजित करून. या गोष्टीला मानसांबरोबर इतिहास आणि काळ ही साक्ष आहे. येथुन खऱ्या अर्थाने आदिवासी साहित्याचा युगप्रवास सुरू झाला."[१]

आदिवासींनी आपल्या पारंपरिक लोककाव्याचा अनमोल ठेवा मोठे कष्ट उपसत निर्माण केला. त्यात प्रथम महादेव गोपाळ कडू व गंगाराम जानु आवारी यांचा उल्लेख केल्याशिवाय पुढे जाता येत नाही. ‘आदिवासी लोकगीत’ हा आवारी यांचा १९५७ साली तर ‘आदिवासींची गोड गाणी’ हा कडू यांचा १९८६ लोकगींचा संग्रह प्रकाशित झाला. या काळात अनेक कवींच्या काही स्वतंत्र काव्यकृती प्रसिद्ध झाल्या.

महाराष्ट्रातील आदिवासींचा पहिला प्रतिनिधीक काव्यसंग्रह ‘मोहोळ’ हा १९८२ साली वणी येथे दूसऱ्या आदिवासी साहित्य संमेलनात प्रसिद्ध झाला. भुजंग मेश्राम व प्रभु राजगडकर यांनी तो संपादित केला आहे. प्रस्तावना नेताजी राजगडकरांची आहे. त्यानंतर कालक्रमानुसार प्रकाशित झालेले काव्यसंग्रह पुढीलप्रमाणे.....

सुखदेव बापू उईके यांचा ‘मेटा पुकार अर्थात पहाडी फुलं’ - भाग १ व २ (१९६२), दत्तात्रय भवारी यांचा ‘मनोगत’ (१९७३), भुजंग मेश्राम यांचा ‘आदिवासी कविता’ (१९७५), उत्तमराव धोंगडे यांचा ‘वनवासी’ (१९८४), डॉ. विनायक तुमराम यांचा ‘गोंडवन पेटले आहे’ (१९८७), वाहरू सोनवणे यांचा ‘गोधड’ (१९८७), भुजंग मेश्राम यांचा ‘उलगुलान’ (१९९०), रवि कुरसंगे यांचा ‘इंद्रियारण्य’ (१९९०), पुरूषोत्तम शेडमाके यांचा ‘वनसूर्य’ (१९९०), प्रा. वामन शेडमाके यांचा ‘जागवा मने पेटवा मशाली’ (१९९१), डॉ. गोविंद गारे यांचा ‘अनुभुती’ (१९९४), उषाकिरण आत्राम यांचा ‘म्होरको’ (१९९७), प्रा. माधव सरकुंडे यांचा ‘मनोगत’ (१९९७), रामचंद्र जंगले यांचा ‘धिक्कार’ (१९९७), रा. चि. जंगले यांचा ‘धरणाच्या भिंती’ (१९९७), सौ. कुसुम आलाम यांचा ‘रान आसवांचे तळे’ (१९९८), सुनिल कुंभरे यांचा ‘तिरकमठा’ (१९९९), कृष्णकुमार चांदेकर यांचा ‘पतुसा’ (१९९९), वसंत कुलसंगे यांचा ‘अस्मितादर्शन’ (२०००), वसंत कनाके यांचा ‘सुक्का सुकूम’ (२००२), बाबाराव मडावी यांचा ‘पाखरें (२००२), तुकाराम धांडे यांचा ‘वळीव’ (२००७), डॉ. संजय लोहकरे यांचा ‘पानझडी’ (२०११), वाहरू सोनवणे यांचा ‘रोडाली’ (२०१४) या

काव्यसंग्रहापर्यंत हा प्रवास असाच सुरू आहे. ह्या व्यतिरिक्त कितीतरी कवींचे संग्रह प्रकाशित होत असून बरेच प्रकाशनाच्या मार्गावर आहेत

आदिवासी आणि काव्य याचा संबंध फार जवळचा आहे. आदिवासी सर्वात प्रथम बोलला तो काव्यातूनच जीवनात येणाऱ्या विविध प्रसंगांना धैर्याने तोंड देतानाच त्याच्या तोंडून काव्य ही तेवढ्याच सहजतेने बाहेर पडले आहे. आदिवासी हा या देशाचा मूळचा निवासी आहे. परंतु आज सर्व समाज हे विसरून गेला आहे. महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या भारत देशामध्ये आजही आदिवासी आपल्या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी व कष्टमय जीवन दूर करण्यासाठी खडतर आयुष्य जगताना दिसून येतो. भरपूर प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती आजूबाजुला असून सुद्धा आदिवासींना त्याचा काहीच उपयोग होत नाही. जल, जंगल व जमीन या नैसर्गिक संपत्तीचा मूळ मालक आज विविध कारणांनी विस्थापित होताना दिसतो. अशा विविध प्रश्नांना समाजासमोर आणण्याचे काम करणारा व स्वतःचे संपूर्ण जीवन आदिवासी लोकांसाठी खर्च करणारा एक स्वयंप्रकाशित कार्यकर्ता म्हणजे कवी वाहरू फुलसिंग सोनवणे असे म्हणावयास हरकत नाही. वाहरू सोनवणे नंदूरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यातील श्रीखेड या खेड्यागावचे रहिवासी. आदिवासी साहित्य चळवळीतील जेष्ठ साहित्यिक म्हणून महाराष्ट्रातच नव्हे तर पूर्ण देशामध्ये त्यांची ओळख आहे. आदिवासी भिल्ल जमातीतील असलेले वाहरू सोनवणे यांचे वास्तव्य श्रीखेड या लहानशा गावात असले तरी त्यांच्या साहित्य व समाजकार्यामुळे आदिवासीत ते लोकप्रिय झाले आहेत. कवी वाहरू सोनवणे यांनी आपल्या 'गोधड' (१९८७) व 'रोडाली' (२०१४) या काव्यसंग्रहातून आदिवासी समाजातील लोकांचे दुःख आपल्या शब्दातून समाजासमोर आणले आहे.

## ❖ प्रतिमा आणि प्रतीकांचा वापर -

वाहरू सोनवणे यांनी आपल्या साहित्य चळवळीत आदिवासींच्या सामूहिक जीवनाला महत्त्व दिले आहे. त्यांची कविता वैश्विक समूहभाव जपणारी आहे. विश्वात वास्तव्य करणाऱ्या आदिवासीच्या सामूहिक भावना ते आपल्या 'गोधड' व 'रोडाली' या कवितासंग्रहातून व्यक्त करतात. त्यांच्या प्रत्येक कवितेत आदिवासींच्या व्यथा, वेदनेचे प्रतिबिंब दिसून येते.

कवी वाहरू सोनवणे यांच्या कविता प्रतिमा आणि प्रतीकांच्या बाबतीत अतिशय समृद्ध आहे. हे 'गोधड' व 'रोडाली' काव्यसंग्रह वाचल्यावर आपल्या लक्षात येते. हे दोन्ही काव्यसंग्रह मुळातच काव्यात्मक आहे. त्यांच्या कवितेच्या शिर्षकातून कवितेचा मर्म अगदी सहज स्पष्ट होते. कवीने

आदिवासींचे दुःख, दारिद्य, निसर्गप्रेम आपल्या कवितेत रेखाटली आहे. यासाठी त्यांनी अनेक प्रतिमा आणि प्रतीकांचा वापर आपल्या लिखाणात केला आहे. याचा प्रत्यय कविता वाचताना पानोपानी येत राहतो.

नेमके प्रतिमा आणि प्रतीके म्हणजे काय? याचा विचार करायचा असल्यास पुढील व्याख्या पाहणे आवश्यक आहे.

प्रतीकासंबंधी फॉस लिहितात,

१) "प्रतीक हे विशिष्ट अर्थाचा निर्देश करणारे असते आणि ते सहजपणे विश्लेषिता येते."[२]

प्रतिमासंबंधी सुधीर रसाळ लिहितात,

२) "आपण जेव्हा कविता वाचतो तेव्हा तिच्यातील काही शब्दामुळे मनःचक्षुसमोर काही वस्तुची किंवा घटनांची चित्रे तरळत असल्याचा अनुभव आपल्यापैकी अनेकांना येतो. अशा चित्रांना प्रतिमा असे म्हणतात."[३]

वि. दा. करंदीकर लिहितात,

३) कल्पनेच्या पातळीवर इंद्रियगोच्चर होऊ शकणारा व जाणिवेने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा होय."[४]

कवितेतील चांगली प्रतिमा कशी असावी हे सांगताना कवी मंगेश पाडगावकर लिहितात,

५) "चांगली प्रतिमा ही अनुभवाशी एकजीव झालेली असली पाहिजे. तिच्यात नाविण्य असले पाहिजे ती सांकेतिक असून उपयोगी नाही. पृथगात्मक आणि नव्या अशा प्रतिमेमध्ये अनुभव घेण्याची एक वेगळी लकब अंतर्हित असते. चांगल्या प्रतिमांच्या प्रकटनात अपरिहार्यता आणि अकस्मातपणा या दोन्ही गोष्टी एकदमच अनुभवाला येतात."[५] अशाप्रकारे अनेक अभ्यासकांनी प्रतिमा आणि प्रतीकांवर आपले विचार व्यक्त केले आहे.

"१९८० नंतर लिहिल्या गेलेल्या कवितेतील प्रतिभाविश्व विलोभनिय आहे. या कवितेने हेतूपूर्वक नव्या वाटा चोखाळल्या आहेत. या कवितेचा प्रवास अत्यंत जबाबदारीने झालेला दिसतो. एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मर्ढेकर, ढसाळ यांच्या लिंगवादी, गृह्यतावाचक शब्दांचे अंधानुकरण कमी झाले. या कवितेने लिंगदर्शक शब्दांना, आक्रस्ताळेपणाला आणि समर्पक प्रतिमांना जाणिवपूर्वक नाकारले आहे."[६] या पार्श्वभूमीवर वाहरू सोनवणे यांच्या कवितेने प्रतिमांचे एक विस्तारित विश्व उभे केले आहे. आदिवासींच्या

जीवनातील दुःखद क्षण पकडून त्यांना प्रतिमांच्या रूपात शब्दबद्ध करून कवितेचे एक नवे रूप त्यांनी सादर केले. कवितेचे नेहमीचे साधेपण सोडून कवीने नव्या प्रतिमा, प्रतीकांचे पंख लावून कवितेला उंच उडाण करण्यास योजनाबद्ध केले आहे. त्याचबरोबर कवितेला वैचारिक परिपक्वतेची एक व्यापक दृष्टी व काव्यात्मक प्रतिमेची भक्कम बैठक दिली. यामुळे वाहरू सोनवणेंच्या कविता साहित्य प्रवाहात आपला ठसा उमटऊन गेली. कितीतरी नव्या प्रतीकांचा, प्रतिमांचा, शब्दांचा मनोहारी संगम 'गोधड' व 'रोडाली' या काव्यसंग्रहात झाला आहे. वाहरू सोनवणे यांच्या कवितेत आदिवासी जीवनाला अनुसरून चंद्र, सूर्य, जंगले, गोधड, हिरवी पाने, ऊस इत्यादी प्रतिमा अनेकदा डोकावतात.

**"माझी फाटकी गोधड / मळलेली / गोधडीतल्या गोधडीत / गुदमरत राहिलो / आंबट / वासाने नाक / खालीवर करून / कुशी बदलत राहिलो / गोधडीत नाक खुपसून / आंबट वास सोसत राहिलो / याच गोधडीत."**

वरील 'गोधड' या कवितेत फाटकी गोधडला शब्दार्थ नाही तर आदिवासींच्या जीवनातील दारिद्र्य व शोषणाचा अर्थ फाटकी गोधड घेऊन येते. आदिवासींच्या दुःखाचे प्रतिनिधीत्व करत गोधड हे प्रतीक कवीने वापरले आहे. फाटकी गोधड हा एकच शब्द पिढीजात दारिद्र्याचा अर्थ सांगून जाते व यातून आदिवासींच्या संपूर्ण पिढीचे दुःख वाचकाच्या डोळ्यासमोर उभे राहते.

**"एक वस्ती / तिथं पाल मांडतात / पोटासाठी / पोट आल तरीही त्यांना / पाल मांडावच लागत / पालमांडी वस्ती ती"**

वरील 'पालमांडी वस्ती' या कवितेतून कवी स्त्रियांवरील दडपशाही आणि शोषणाचे जीवनातील अस्तित्त्व व्यक्त करतात हे मांडत असताना जीवनाची समग्रता आणि त्यातल्या दुःखाची वाच्यता कवी आपल्या कवितेत करतो. 'पालमांडी' या शब्दामागे 'वेश्या व्यवसाय करणारी' हा अर्थ अभिप्रेत आहे. या स्त्रियांच्या जीवनातील दुःख व्याकुळता कवीने या कवितेत प्रतीकांच्या माध्यमातून व्यक्त केली आहे. अशा स्त्रीयांची समाजात होणारी होरपळ व त्यांच्या जीवनाचा झालेला नाश कवी आपल्या कवितेत व्यक्त करतात.

**"कुंदाच खळं खणतां खणता / दिवस ढळून गेला / अजून भाकरीचा पत्ता नाही / खणता-खणता / हाड गेली मसणात / वितभर पोटासाठी"**

वरील 'कुंदाच खळं' या कवितेत श्रमिक वर्गाचे दुःख कवीने आपल्या प्रतीकांतून व्यक्त केले आहे. 'कुंदाच खळं' हा शब्द 'मालकाचे काम' या अर्थाने वापरला आहे. तर हाड गेली मसनात म्हणजेच संपूर्ण आयुष्य कष्ट करता करता संपून गेले. परंतु आयुष्यात सुख काही आले नाही. हे आयुष्य या पोटासाठी कष्ट करण्यातच निघुन गेले असा आशय या कवितेतून व्यक्त होतो. अशा अनेक प्रतिमांतून कवीने आदिवासींचे जीवन शब्दबद्ध केले आहे.

**"सत्तेच्या हिरव्या पानाखाली / झोपा घेणारे बगडे / झोपेशी भांडत आहे. / आणि त्यांच्या पाठिंब्यावर / लचके तोडणाऱ्यांना / धडकी भरली आहे."**

वरील 'हाका जखमांच्या' या कवितेतून कवीने सत्ताधारकांना उद्देशून बगळा हे प्रतीक वापरले आहे तर शोषित वर्गाला उद्देशून जखमा हे प्रतीक वापरले आहे. आजच्या लोकशाहीत सत्ताधारक नेते स्वतःच्या हितासाठी लढतात. दूसऱ्याला पाठिंबा देतात व स्वतः सुखाची झोप घेतात. परंतु जो शोषित वर्ग आहे, त्यांचा विचार कोणी करत नाही. त्यांच्या समस्या कोणी सोडवत नाही. असा सार या कवितेतून वाहरू सोनवणे यांनी व्यक्त केला आहे.

अशाचप्रकारे 'रोडाली' या काव्यसंग्रहाचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, 'गोधड' प्रमाणेच 'रोडाली' या काव्यसंग्रहातील प्रतीकेसुद्धा जीवनाशी एकनिष्ठ झालेली आहे.

**"जीवनाचा शोध घेताना / त्याने एका झोपडीसमोर बसलेल्या / एका आदिवासीला प्रश्न केला / 'या जंगलात तुम्ही कसे जगता?' / आदिवासी हसला आणि काहीच बोलला नाही / तेव्हा तो / त्याच्या चेहऱ्याकडे बघतच राहिला / त्यात त्याला निसर्गाचे / सौंदर्य दिसले."**

वरील 'जीवनाचा शोध घेताना' या कवितेत कवीने 'त्याने', 'तो' या प्रतीकांचा अगदी सहज वापर केला. एक म्हणजे आदिवासीला प्रश्न विचारणारा व्यक्ती तर दुसरा म्हणजे स्वतः आदिवासी ही दोन्ही प्रतीके सारखी वाटत असली तरी ती वेगळ्या व्यक्तींसाठी वापरली आहे. त्याचबरोबर त्याला त्यात निसर्गाचे सौंदर्य दिसले. या ओळीत निसर्गाचे सौंदर्य म्हणजे निसर्गात असलेली समाधानी वृत्ती. कोणाचाही हेवा-दावा न करता जगण्याची वृत्ती, स्वाभाविकपणा, धर्मनिरपेक्षपणा इत्यादी सर्व शब्दासाठी कवीने निसर्गाचे सौंदर्य हे प्रतीक वापरले आहे.

**"त्यांचे ऐकत नाही म्हणून / रडवणारेही तेच / आणि त्यांचे ऐकले तर / गोड-गोड बोलून / अश्रू पुसणारे ही तेच"**

वरील 'तेच' या कवितेत कवी वाहरू सोनवणे यांनी समाजातील उच्चभ्रू वर्गीयांना, नेते मंडळींना उद्देशून 'त्यांचे' हे प्रतीक वापरलेले दिसून येते. वाहरू सोनवणेंच्या मते समाजातील सत्ताधारक उच्चवर्गीय लोकांचे जर ऐकले तर ते गोड बोलतात, परंतु त्यांचे म्हणणे जर ऐकले नाही, तर तेच आदिवासींच्या अश्रुला कारणीभूत सुद्धा ठरतात. यावरून उच्चवर्गीयांचा आदिवासी जमातीवर असलेला दबाव स्पष्ट होतो.

**"लोकशाहीच्या वारसदारांनो / लोकशाहीचा गाभारा मलाही सांगावे / मी ही दुसऱ्यांना सांगेन / माझे कर्तव्य लोकशाहीला वाहीन !"**

वरील 'लोकशाही' या कवितेतून कवीने लोकशाहीच्या वारसदारांनो म्हणजे सत्ताधारकांना उद्देशून प्रश्न विचारला आहे की या लोकशाहीचा गाभारा म्हणजे लोकशाहीचे तत्व, लोकशाहीचे वास्तव रूप कसे आहे ते आम्हाला पण सांगा. अशा प्रतीकात्मक स्वरूपात मांडून या समाजव्यवस्थेला प्रश्न विचारला आहे. लोकशाहीत होणारी सामान्यांची ससेहोलपट का? असा रोख सवाल करताना वाहरू सोनवणे वरील प्रतीकांचा आधार घेताना दिसतात.

**"एक घाम गाळतो / एक गादीवर लोळतो / एक हसतो / एक रडतो / जिथं भेद तिथ लुट आहे / जिथ लुट तिथ दुःख आहे / दुःखात दुनिया हैराण आहे / माणूस-माणसाचा वैरी झाला आहे / भेदाची दुनिया जीव खाते / दुखत नाही दिसत नाही / जीव आहे जीवन हव / बदल घडवायला / एक लढाई हवी."**

वरील 'लढाई' या अनुवादित कवितेत कवीने समाजव्यवस्थेतील भीषण तफावत दर्शविली आहे. समाजात असलेली परिस्थितीची दोन टोके कवितेतून व्यक्त झाली आहे एक म्हणजे श्रीमंती आणि दुसरे म्हणजे दारिद्य भेद या शब्दातून कवीने प्रतीकात्मक स्वरूपात समाजातील तफावत दर्शविली आहे. त्याचबरोबर जीव आहे, जीवन हव याचा अर्थ असा की दारिद्री समाज फक्त नावापुरता जिवंत आहे पण समाजाच्या प्रवाहात तो खुप मागे आहे. त्याला सुद्धा या प्रवाहाप्रमाणे विकास करावयाचा आहे. अशी प्रतीके वापरून कवीने संपूर्ण आदिवासींच्या जीवनाचा सार कवितेतून व्यक्त केला आहे.

अशाप्रकारे 'गोधड' व 'रोडाली' हे काव्यसंग्रह म्हणजे आदिवासी भावनेत गुंतलेले कवी मन आहे. पूर्वजांपासून वारसदारांपर्यंत 'फाटकी गोधड' दारिद्र्याच प्रतीक आहे. आदिवासीच आर्थिक व मानसिक शोषण करणारे, रस पिणारे उस आहे. 'देवदासी' कवितेत स्त्री दास्य सुचित करणाऱ्या 'देवाच्या बकऱ्या' आहेत. माणुसकी देणारा चंद्र, आश्वासनांचे फुगलेले फोड, दास्याचा गारठा, फुगलेली जनावर, दुःखाचं हिरवं वन, बांधाचे बंधन, कुंदाच खळ, निराधारांना झोडपण्याच प्रतीक म्हणून पाऊस इ. प्रतिमा, प्रतीके आदिवासी जीवन सन्मुख आहे. आदिवासींच्या विविध स्तरीय शोषणाचा अर्थ या प्रतिमांना प्राप्त होतो आहे.

❖ **निष्कर्ष -**

१) कवीच्या प्रत्येक कवितेत प्रतिमा आणि प्रतीकांचा वापर झालेला दिसून येतो.

२) वाहरू सोनवणे यांच्या कवितेत आदिवासींचे दुःख, दारिद्य अनेक प्रतीकांतून व्यक्त झाले आहे.

३) वाहरू सोनवणे यांचे अनुभव प्रतिमांच्या भाषेतून समर्थपणे व्यक्त होताना दिसते.

४) वाहरू सोनवणे यांच्या कवितेतील प्रतिमांतून त्यांची आदिवासी समाजाविषयी, निसर्गाविषयीची उत्कट ओढ आणि विद्रोह वृत्ती दिसून येते.

५) वाहरू सोनवणे यांच्या कविता केवळ खुलविण्यासाठी या प्रतिमा कवितेत येत नाहीत तर कवितेचे एक अपरिहार्य अंग म्हणूनच तिथे त्या वावरतात. निसर्गाच्या, आदिवासींच्या दारिद्य व अन्यायातून त्यांच्या प्रतिमांची जडण-घडण झालेली आहे.

❖ **संदर्भ ग्रंथसूची -**


१) तुकाराम रोंगटे, 'आदिवासी कवितेचा उषःकाल व सद्यास्थिती', प्रथम आवृत्ती, २००७, संस्कृती प्रकाशन व ग्रंथ संपदा पुणे, पृ. ०१

२) Philip Wheelwright, 'Semitics & Ontology Metaphor & Symbol'. Pg. 06

३) सुधीर रसाळ, 'कविता आणि प्रतिमा', मौज प्रकाशन गृह, प्रथम आवृत्ती, १९८२, पृ. २७१

४) गो. वि. करंदीकर, 'परंपरा आणि नवता', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. द्वितीय आवृत्ती १९८०, पृ. १०९

५) तत्रैव, पृ. ११२

६) अशोक विष्णुपंत थोरात, 'टंकलिखित शोधप्रबंध', सन २००८-०९, पृ. ४५